# पिकावरील कीड-रोग सर्वेक्षण व सल्ला प्रकल्प
## कीटकशास्त्र विभाग, वनामकृवि, परभणी
इ-मेल- entomkv@gmail.com


जा.क्र. जिझेडई/क्रॉपसॅप/ ३९९ /२६
दिनांक: १९.०८.२०२६

## आवाहन क्र. ११

## सोयाबीनवरील खोडमाशी व चक्री भुंग्याचे असे करा व्यवस्थापन

महाराष्ट्रातील शेतकऱ्यांसाठी सोयाबीन हे अत्यंत महत्त्वाचे नगदी पीक असून, या पिकाच्या उत्पादनावर शेतकऱ्यांचे आर्थिक उत्पन्न मोठ्या प्रमाणात अवलंबून आहे. सोयाबीन पिकाची उत्पादकता कमी होण्यामागे किडींचा प्रादुर्भाव हे एक प्रमुख कारण आहे. सोयाबीन पिकावर प्रामुख्याने चक्रीभुंगा व खोडमाशी या किडींचा प्रादुर्भाव आढळून येतो. चक्रीभुंग्यामुळे सोयाबीन पिकाचे २९ ते ८३ टक्क्यांपर्यंत, तर खोडमाशीमुळे ५० टक्क्यांपर्यंत नुकसान होऊ शकते. त्यामुळे किडींचे वेळीच निरीक्षण करून एकात्मिक कीड व्यवस्थापन पद्धतीचा अवलंबनाचा सल्ला वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठातील किटकशास्त्र विभागाचे शास्त्रज्ञ डॉ. अनंत लाड, डॉ. पुरुषोत्तम नेहरकर, डॉ. राजरतन खंदारे, डॉ. योगेश मात्रे यांच्या वतीने देण्यात आला आहे.

### ❖ खोडमाशी

**प्रादुर्भावाची लक्षणे:** खोडमाशीचा प्रादुर्भाव पिक लहान असतानाच सहजपणे ओळखु येतो. सोयाबीनचे रोप लहान असताना म्हणजे १५ ते २० दिवसांच्या आसपास जर झाडाचा शेंडा सुकून खाली झुकलेला आढळला तर त्या झाडावर खोडमांशीचा प्रादुर्भाव झाला असण्याची शक्यता असते. असा शेंडा मधोमध कापल्यास आत मध्ये लहान पिवळी अळी जमिनीच्या बाजूने डोके असलेली म्हणजेच खालच्या दिशेने खोड पोखरत जात असलेली दिसते. रोप मोठे झाल्यावर या किडीचा प्रादुर्भाव झाल्यास मात्र तो लक्षात येत नाही व शेवटी फक्त प्रौढ माशी निघून छिद्र फांदीच्या खोडाजवळील बाजूस दिसते.

### ❖ चक्री भुंगा

**प्रादुर्भावाची लक्षणे:** शेतात पिकाची पाहणी करताना एखाद्या झाडाचे पान किंवा फांदी सुकलेली आढळल्यास चक्रीभुंग्याचा प्रादुर्भाव असण्याची शक्यता असते. चक्रीभुंगा मादी फांदीवर खाचा करून त्यामध्ये अंडी घालते. खाचेच्या वरील भागातील पान किंवा फांदी हळूहळू सुकून वाळते. अंड्यातून बाहेर पडलेली अळी पानाचा देठ, फांदी आणि त्यानंतर खोडाच्या आतील भागात प्रवेश करून खोड पोखरत जमिनीच्या दिशेने जाते. त्यामुळे प्रादुर्भावग्रस्त फांदी

किंवा खोड कमकुवत होऊन सुकण्याची शक्यता असते. म्हणून शेतात सुकलेली पाने किंवा फांद्या दिसताच त्यांची बारकाईने तपासणी करणे आवश्यक आहे.

❖ **सध्यस्थितीत एकात्मिक कीड व्यवस्थापन :**

- खोडमाशी व चक्रीभुंगा प्रादुर्भावग्रस्त झाडे काढून आतील अळीसहित नष्ट करावेत.
- ५ टक्के निंबोळी अर्काची ५० मिली १० लिटर पाण्यातून फवारणी करावी.
- किडीने आर्थिक नुकसानीची पातळी ओलांडल्यानंतरच रासायनिक किटकनाशकांचा वापर करावा.

| **किडी** | **कीटकनाशके** | **प्रमाण प्रति लिटर पाणी** |
|---|---|---|
| खोडमाशी व चक्री भुंगा | ईथीऑन ५० ईसी किंवा | ३ मिली |
| | क्लोरॅन्ट्रानिलीप्रोल १८.५ एससी किंवा | ०.३ मिली |
| | थायमिथोक्झाम १२.६ + लॅमडासाहॅलोथ्रीन ९.५ झेडसी किंवा | ०.२५ मिली |
| | क्लोरॅन्ट्रानिलीप्रोल ९.३ + लॅमडा साहॅलोथ्रीन ४.६ झेडसी | ०.४ मिली |

**नोट :** वरील सर्व कीटकनाशकाचे प्रमाण साध्या/ नॅपसॅक पंपासाठी आहे पेट्रोल पंपासाठी हे प्रमाण तीन पट वापरावे. फवारणीसाठी स्वच्छ पाणी वापरावे. शेतात कीटकशकांचा वापर करतांना हातमोजे, तोंडावर मास्कचा, डोळ्यावर चष्माचा वापर करावा व सुरक्षितेची योग्य ती काळजी घ्यावी.

समन्वयक अधिकारी
क्रॉप्सॅप प्रकल्प तथा सहाय्यक प्राध्यापक
कीटकशास्त्र विभाग,
वनामकृवि,परभणी

**प्रत :**

१. मा. संचालक विस्तार शिक्षण, वनामकृवि, परभणी यांना माहितीस्तव
२. मा. कृषि संचालक (विस्तार व प्रशिक्षण), कृषी आयुक्तालय, म.रा., पुणे यांना माहितीस्तव
३. मा. विभागीय कृषि सहसंचालक, लातूर/छ.संभाजीनगर यांना कार्यवाहीस्तव



खोडमाशी



चक्री भुंगा